~~२८~~ ~~२९३~~ ~~२७५~~

-७-

प्रवास भत्यातील खार्चात काटकसर करण्याची

आवश्यकता.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
परिपत्रक क्रमांक: एस-५/८२/सीआर-१२०६/८८०६०६ [ए] ब-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २९ नोव्हेंबर १९८२

पहा :- शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक बी जीटी-२५८२/२८-बीयू
दिनांक ११ जून १९८२

परिपत्रक.

तुटीच्या अर्थसंकल्पाला मर्यादा घालण्यासाठी १९८२-८३ च्या योजने तर बाबीतील मजुरी, प्रवास खार्च, कार्यालयीन खार्च इत्यादि बाबींवरील प्राधिकृत अनुदानांत यापूर्वीच दहा टक्के कपात करण्यात आलेली असून या बाबीवरील खार्च उर्वरीत अनुदानांतच भागविण्यासंबंधी आदेश सर्व नियंत्रणाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. या वर्षी महाराष्ट्राच्या बऱ्याच भागांत अनियमित व अत्यंत थोडा पाऊस पडल्यामुळे टंचाई सदृश परिस्थिती निर्माण झाली असून पिण्याचे पाणी पूरवठा वगैरेवर प्रचंड खार्च अपेक्षीत आहे. हा प्रचंड खार्च पेलण्यासाठी इतर अनावश्यक बाबीवरील खार्चात आणखी काटकसर करणे आवश्यक आहे. अशी काटकसर प्रवास खार्चात आणखी काटकसर करुन करता येईल. हल्लीच्या काही वर्षांत प्रवास खार्च या बाबीवरील खार्चात दरवर्षी ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्तच वाढ झालेली दिसून येते. हा वाढता खार्च वेळीच मर्यादित राखणे आवश्यक आहे. मागे दिनांक १६ व १७ जून १९८२रोजी झालेल्या आयुक्त व जिल्हाधिकारींयांचे परिषदेत या विषयाची काहीशी चर्चा झाली ~~अरु~~ होती आणि त्या चर्चेत मंत्रालयीन विभागातील मंत्रालयात भरणाऱ्या शासकीय बैठकांना जिल्हाधिकारी विभागीय आयुक्त यांना वारंवार हजर रहाण्यास सांगणे टाळावे असे ठरले होते. त्याचप्रकारे जिल्हाधिकारी विभागीय आयुक्त व इतर विभाग प्रमुख यांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी होणाऱ्या शासकीय बैठकांना दुय्यम अधिकाऱ्यांना अत्यंत आवश्यक असेल तेथेच बोलावल्यास प्रवास खार्चावरील बिलात फार मोठी काटकसर करता येईल. तसेच तहसिलदार किंवा तत्सम अधिकाऱ्यांना त्यांच्या अधिकार क्षेत्रांतील गांवात

जिल्हाधिकारी रत्नागिरी
-कार्यालय-
3 DEC 1982
शाखा- AB

जिल्हाधिकारी रत्नागिरी
-कार्यालय-
6 DEC 1982
शाखा-

4595

388

परिषदेत निदर्शनाला आणण्यात आले होते. वारंवार एकाच ठिकाणाच्या दौ-यामुळे सुध्दा प्रवास खर्च पेट्रोल इत्यादी वरील खर्चात वाढ होणे अपरिहार्य होते. वर उल्लेखिल्याप्रमाणे प्रवास खर्चात मोठया प्रमाणात बचत होणे आर्थिक शिस्तीच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असल्यामुळे असे आदेश देण्यात येत आहेत की वरील प्रकारे होणा-या अनाठाई खर्चाला ताबडतोब परिणामकारक आळा घालण्यात यावा.

मात्र प्रवास खर्चात काटकसर करताना कार्यक्षमता किंवा टंचाई च्या परिस्थितीचा मुकाबला करण्याच्या प्रयत्नात कोणतीही शिथिलता येऊ देऊ नये. ज्या ठिकाणी अनेक अधिका-यांना एकाच शासकिय वहानातून जाणे शक्य असेल त्या ठिकाणी योग्य ते समायोजन करून एकाच वहानाचा उपयोग करावा. या वित्तिय वर्षात प्रवास खर्च या बाबीखाली जे कमी करून दिलेले अनुदान आहे त्याच्या पलिकडे अतिरिक्त खर्च केल्यास अतिरिक्त अनुदान मंजूर केले जाणार नाही आणि असा अतिरिक्त खर्च करणा-या अधिका-यास त्याबद्दल जबाबदार धारले जाईल. वरील आदेश ज्या तालुक्यामध्ये, उपविभागामध्ये अथवा जिल्हामध्ये एक तृतीयांश किंवा त्यापेक्षा अधिकगावे अवर्षणग्रस्त असतील त्याचे तहसिलदार, उप जिल्हाधिकारी व जिल्हाधिकारी यांना लागू होणार नाही.

महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या आदेशाने व नांवाने,

[ वि. रंगनाथन ]
सचिव.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी ,
जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य पुणे
नोंदणी महानिरिक्षक महाराष्ट्र राज्य पुणे.
मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य पुणे
वन संरक्षक सर्व मंडळे,
सर्व विभागीय वन अधिकारी
सर्व विभागीय उप संचालक भूमि अभिलेख
मुद्रांक अधिक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
प्रबंधक महसूल न्यायाधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
महाव्यवस्थापक, पुनर्वसन उत्पादन केंद्र उल्हासनगर
सेटीलमेंट कमिशनर फॉर कॉम्पेन्सेशन पुल
प्रॉपर्टिज तथा कॉम्पिटंट ऑफिसर वकील हाउस, स्प्रॉट रोड
बॅलार्ड इस्टेट, मुंबई